Estd.1962
NAAC 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक क्रं. 2

विषय : **शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील ऑक्टो/नोव्हें. 2021 हिवाळी सत्रातील परीक्षांच्या विलंब व अतिविलंब शुल्कात शंभर टक्के सवलत देण्याबाबत.**

संदर्भ : शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/704, दि. 29 ऑक्टोंबर, 2021 चे पत्र.

शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील ऑक्टो./नोव्हें. 2021 हिवाळी सत्रातील परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी उपरोक्त सदंर्भीय पत्रानुसार तारखा प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/विद्यापीठ अधिविभाग स्तरावर विद्यार्थ्यांच्याकडून परीक्षा अर्ज स्विकारण्याची कार्यवाही सुरू आहे.

**कोविड–19 मुळे उदभवलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अधिकार मंडळाने शैक्षणिक वर्ष 2021–22 मधील ऑक्टो./नोव्हें. 2021 हिवाळी सत्रातील परीक्षांच्या विलंब व अतिविलंब शुल्कात शंभर टक्के सवलत देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असल्याने परीक्षा शुल्कासोबत कोणत्याही विद्यार्थ्याकडून विलंब शुल्क अथवा अतिविलंब शुल्क स्विकारण्यात येवू नये.**

विद्यार्थ्यांच्या कडून विहित वेळेत परीक्षा अर्ज भरून घेवून महाविद्यालयाने विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करण्याबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार कार्यवाही करण्यात यावी.

तसेच सर्व अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांकरीता परीक्षा शुल्कात विलंब व अतिविलंब सवलतीबाबतचे सदरचे परिपत्रक सर्व संबंधीत विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे.

गजानन पळसे
प्र. संचालक
(परीक्षा व मूल्यमापन मंडळ)

**जा. क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/737**
**दि.** 26 NOV 2021

प्रत– माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी

1. मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
   सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्था/अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
3. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.
4. परीक्षा विभागातील सर्व संबधित विभाग व अधिकारी – पुढील कार्यवाहीसाठी
5. दूरशिक्षण केंद्र
6. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता
7. जनसंपर्क अधिकारी – प्रसिध्दीकरीता